| Seat No. | |
|---|---|

**B.A. (Part - II) (Semester - III) (CBCS) Examination, November - 2019**

**MARATHI (मराठी)**

# DSC - C2 : काव्यगंध (Paper - IV)

**विद्याशाखीय विशेष गाभा**

**Sub. Code : 73347/77647**

**Day and Date : Wednesday, 20 - 11 - 2019** **Total Marks : 50**

**Time : 12.00 noon to 2.00 p.m.**

Kamala College Kolhapur, Krantiveer Rangnodada Patil Library
LIBRARY

**सूचना :** 1) **सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

2) **उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.**

**प्र.1)** योग्य पर्याय निवडा. **[10]**

अ) 'ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा' असे कोण म्हणतो आहे?

i) अंत्यजाचे मूल ii) नवाशिपाई

iii) मजूर iv) ब्राह्मण

ब) .............. जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका.

i) नवे ii) जुने

iii) आताचे iv) उद्याचे

क) 'फुंकर' कवितेतील प्रियकराला काचेच्या कपाटात काय दिसते?

i) उलटे उत्तान हृदय ii) प्रेयसीचा फोटो

iii) भुशांच्या राघूमैना iv) रविवर्म्याची चित्रे

ड) कष्टकरी आई आपल्या मुलांना कारखान्याची आरास बघायला कधी घेऊन जायची?

i) दसऱ्याच्या आदल्या दिवशी ii) गुढीपाडव्याला

iii) नागपंचमीला iv) दिवाळीला

इ) नेहरू गेले तेव्हा कोण कागदी खोलीत उजेड घेऊन चालला होता?

i) म्हातारा ii) कामगार

iii) सुंद्री iv) हातगाडीवाला

*P.T.O.*

फ) वसंत आबाजी डहाके यांच्या कोणत्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता?

i) निवडक कविता ii) योगभ्रष्ट

iii) चित्रलिपी iv) शुनःशेप

य) भाषेतून काय निर्माण केलं जातंय असे कवी वसंत आबाजी डहाके यांना वाटते?

i) सत्य ii) असत्य

iii) देव iv) वास्तव

र) दंगलीतली आडमूठी भाषा काय विसरते?

i) हिंसा ii) शस्त्रे

iii) माणुसकीचे व्याकरण iv) समष्टी

LIBRARY
Kamala College Kolhapur, Krantiveer Rangrao Patil Library

ल) मतलबी माणूस काय पेरायला लागला आहे?

i) जातीयता ii) धर्मांधता

iii) राग iv) षडयंत्राची बिजे

व) कल्पना दुधाळ यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव काय?

i) सिझर कर म्हणतेय माती ii) धग असतेच आसपास

iii) सनद iv) माझे विद्यापीठ

**प्र.2)** 'केशवसुतांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक कवितेतून येतो' या विधानाचा परामर्श घ्या. **[10]**

किंवा

वसंत बापट यांच्या कवितेतून प्रेमाचे विविध रंग कसे प्रकट होतात ते सविस्तर लिहा.

**प्र.3)** नारायण सुर्वे यांच्या कवितेतून कष्टकऱ्यांचे जग कसे चित्रित झाले आहे ते लिहा. **[10]**

किंवा

महानगरीय जाणिवांचे तपशील डहाके यांनी आपल्या कवितेत कसे प्रकट केले आहेत?

**प्र.4)** थोडक्यात उत्तरे द्या. (चारपैकी दोन) **[10]**

अ) दंगलीमागचे भयावह राजकारण कवीने कसे मांडले आहे?

ब) अजीम नवाज राही आपल्या कवितेतून मोहल्ल्यातील माणसे आणि त्यांचे जग कसे जिवंत करतात?

क) कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या कृषिकेंद्रित स्त्रीजाणिवेचे वेगळेपण दाखवा.

ड) शेतकरी स्त्रीच्या आयुष्याची होरपळ कल्पना दुधाळ यांच्या कवितेतून कशी व्यक्त होते?

**प्र.5)** खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (चारपैकी दोन) **[10]**

अ) काव्यलेखन करताना कोणकोणत्या घटकांना महत्त्व द्यावे?

ब) काव्यनिर्मितीत भाषा, नाद, लय, प्रतिमा, प्रतीके यांचे महत्त्व काय असते ते स्पष्ट करा.

क) पहिल्या पावसात भिजल्याचा अनुभव कवितेतून व्यक्त करा.

ड) महापुरामुळे झालेल्या स्थितीचे कवितेत चित्रण करा.

Karmala College Karmala, Krantiveer Ramrao Patil Library
LIBRARY